जिल्हा परिषद अमरावती
मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे कार्यालय
कॅम्प रोड, अमरावती ४४४ ६०१
दूरध्वनी क्रमांक - २६६२९२६ ई मेल - ceozp.amravati@maharashtra.gov.in
वेबसाईट - www.zpamravati.gov.in

क्रमांक - जिप/मुकाअ/स्विस/१९८/१६ दिनांक -२९ नोव्हेंबर, २०१६

प्रति,

उप अभियंता,
बांधकाम उपविभाग (सर्व)
जिल्हा परिषद अमरावती

**विषय - बांधकाम विषयक कामांची गुणवत्ता राखण्यासाठी घ्यावयाची दक्षता..**

माझे असे निदर्शनास आले आहे की, आपल्या विभागामधील कामकाजात पुढील प्रकारच्या अनियमितता आढळुन आलेल्या आहेत. बांधकाम विषयक कामांची गुणवत्ता राखण्यासाठी तसेच आर्थिक अनियमितता होवू नये यासाठी खालील प्रमाणे दक्षता घ्यावी. जसे,

1. कार्यकारी अभियंता यांना 5 % कामाची तपासणी त्याच प्रमाणे सार्वजनिक बांधकाम विभागाचे मापदंडानुसार उप अभियंता आणि शाखा अभियंता यांनी सुरु असलेल्या कामाची तपासणी केल्याशिवाय देयक मंजुरीची शिफारस करु नये. परंतु असे निदर्शनास येत आहे की, सदरची तपासणी ही प्रत्यक्ष मौकास्थळी भेट न देता कार्यालयात बसुनच करण्यात येत असल्याच्या तक्रारी प्राप्त होत आहेत.
2. उपविभागातील कामे ज्या अभियंताच्या पयवेक्षणात झालेली आहेत त्या संबंधित उपअभियंता यांचेकडून सदर कामासाठीची मुल्यांकनाची पाहणी/तपासणी होणे आवश्यक आहे. परंतु अधिकारक्षेत्राबाहेरील उपअभियंता यांनी देयकावर स्वाक्षरी करुन पाठविण्यात येवु नयेत.
3. असे निदर्शनास आले आहे की, सुरु असलेल्या कामाच्या ठिकाणी भेटवही ठेवण्यात येत नाही. त्यामुळे प्रत्यक्ष भेटीच्या दरम्यान आढळलेल्या बाबींची नोंद होवु शकत नाही.
4. बांधकाम वारंवारता (frequency) प्रमाणे चाचणी अहवाल घ्यावा. त्यानुसार प्रयोगशाळेचा अहवाल देयकासोबत जोडून सादर करावा.
5. प्रत्येक चालु लेखा देयकातून (Running Account Bill) स्वामीत्वधन (royalty) कपात झाले आहे किंवा नाही याची खात्री उपअभियंतास्तराव करण्यात यावी. तसे होत नसल्यास ती बाब सबंधित अधिका-यांचे निदर्शनास आणावी.

उप अभियंता यांनी आपल्या उपविभागस्तरावर देयकाची शिफारस करण्यापूर्वी याबाबतची खात्री करुन अशा प्रकारच्या चुका होणार नाहीत याची काळजी घ्यावी. आपल्या उपविभागाच्या आकस्मिक तपासणीमध्ये अशा प्रकारची अनियमितता आढळून आल्यास गंभीर कारवाईस करण्यात येईल यांची नोंद घ्यावी तसेच सदरची बाब आपले अधिनस्त सर्व शाखा अभियंता/कनिष्ठ अभियंता यांचे निदर्शनास आणावी.

**(डॉ. किरण कुलकर्णी, भाप्रसे)**
**मुख्य कार्यकारी अधिकारी**
**जिल्हा परिषद अमरावती**

प्रतिलिपी

१. अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी सामान्य, जिल्हा परिषद अमरावती यांना माहितीस अग्रेषित.

२. मुख्य लेखा व वित्त अधिकारी, जिल्हा परिषद अमरावती यांना उचित कार्यवाहीस्तव अग्रेषित.

3. कार्यकारी अभियंता बांधकाम, जिल्हा परिषद अमरावती यांनी उचित कार्यवाहीस्तव अग्रेषित. आपले विभागातंर्गत वरील बाबींची पडताळणी करण्याची सूचना संबंधित शाखेस देण्यात यावी. यामध्ये हेतुपुरस्पर दिरगांई झाल्यास संबंधित अधिकारी- कर्मचारी यांचेवर गंभीर शास्तीची कारवाई करण्यात येईल याची संबंधितांना जाणीव करुन देण्यात यावी.